संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

शनिवार,
३० जानेवारी २०१६
मूल्य रु.१०




**‘तारतम्य’कार टिकेकर गेले...**
संपादकीय



**सुवर्णमहोत्सवी बालभारती**
माधव राजगुरु



**संविधान : कॅबिनेट मिशन ते ऑबजेक्टिव्ह रिझोल्यूशन!**
लक्ष्मीकांत देशमुख

**ध्यास खेडोपाडी भारतीय रागसंगीत प्रसाराचा!**
विदुर महाजन



मुलाखत

विदुर महाजन

सप्टेंबर २०१३ मध्ये मंगरूळ गावात श्री गणेशा केलेल्या प्रकल्पाने अवघ्या सव्वादोन वर्षांत पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, नंदुरबार, जळगाव या सहा जिल्ह्यांतील खेड्यांतील शाळांचा दौरा केला. यामध्ये आजवर ७५ शाळांतील ३५००० हून अधिक शालेय विद्यार्थ्यांनी, १५००० हून अधिक खेड्यातील गावकऱ्यांनी, शिक्षकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. ऐकताना विश्वास बसणार नाही; पण यातील सत्य असे की– इतक्या विद्यार्थ्यांमध्ये, लोकांमध्ये एकानेही तोपर्यंत सतार प्रत्यक्ष पहिली वा ऐकली नव्हती.

# ध्यास खेडोपाडी भारतीय रागसंगीताच्या प्रसाराचा!

विदुर महाजन. गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ सतारवादन करणारे, पुण्याजवळील तळेगाव दाभाडे येथील एक ज्येष्ठ कलाकार. सतारवादन हाच आपला ध्यास आणि श्वास मानणाऱ्या विदुर महाजन यांनी केवळ शास्त्रीय संगीतातील एक अतिशय गुणी कलावंत एवढीच आपली ओळख सीमित ठेवली नाही; तर सतार हे माध्यम मानून त्यांनी त्याविषयी सखोल चिंतन करत या पिढीपर्यंत अनेक मार्गांनी, अनेक प्रकल्पांद्वारे संगीतविषयक, जीवनमूल्य-विषयक आपले विचार पोहोचवले. सुरुवातीला उस्ताद उस्मान खान यांच्याकडे सुमारे २० वर्षे सतारीचे धडे घेतलेले विदुर महाजन यांना गानसरस्वती पद्मविभूषण किशोरीताई आमोणकर यांच्याकडून तसेच उस्ताद शाहीद परवेझ यांच्याकडूनही मार्गदर्शन मिळाले. सतारीचे स्वतंत्र कार्यक्रम १९८९ पासून करणारे विदुर महाजन यांनी जगभर ६०० हून अधिक मैफली यशस्वी करत सतारवादनात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. किशोरीताईंकडे शिकताना एकदा त्या असे म्हणाल्या, ‘‘स्वरांमधून संगीत निर्माण होत नाही, स्वरांमध्ये असलेल्या नात्यांमधून संगीत निर्माण होतं.’’ या वाक्यावर चिंतन करताना विदुर महाजन यांच्या मनामध्ये एका कल्पनेची ठिणगी पेटली आणि त्यातून जन्म झाला संघबांधणीवर आधारित एका नव्या प्रकल्पाचा! त्यांच्या असे लक्षात आले की– संघबांधणी करताना केवळ माणसं एकत्र येऊन संघ निर्माण होत नाही, तर त्यांच्यातील एकत्र नात्यांमधून संघबांधणी केली जाते. ‘टकमन्स मॉडेल ऑफ टीम बिल्डिंग’नुसार संघबांधणीच्या ज्या पायऱ्या आहेत– उदाहरणार्थ Forming , Norming, Storming आणि Performing- विदुर महाजन म्हणतात, सतारीवर ज्या पद्धतीने एखादा राग मांडला जातो, त्या पद्धतींमध्येदेखील अशाच प्रकारच्या पायऱ्या आश्चर्यकारकपणे आढळून येतात. त्यातील साधर्म्य स्थळे शोधता-शोधता संघबांधणीचा हा प्रकल्प निर्माण झाला आणि तो कॉर्पोरेट जगतात अनेक ठिकाणी त्यांनी यशस्वीपणे सादर केला. सतारीवर राग मांडताना सुरुवातीचा भाग म्हणजे आलाप हा खूप प्रभावी होतो आणि लोकांना तो खूपच भावतो, हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी या सुंदर नादाचा ध्यानधारणेच्या प्रक्रियेत उत्प्रेरक म्हणून वापर करण्याचे ठरविले आणि त्यातून एक आगळा-वेगळा प्रकल्प साकारला, तो म्हणजे– 'Meditation with Sitar'. सन २००९-१० मध्ये लोणावळ्यातील कैवल्यधाम येथे या प्रकल्पांतर्गत त्यांच्या १०० हून अधिक कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लेखक म्हणूनही विदुर महाजन यांची ओळख

महाराष्ट्राला आहे. ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या ‘मैत्र जीवाचे’ या त्यांच्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा सर्वोकृष्ट वाङ्‌मयनिर्मिती पुरस्कारासह इतर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. आयुष्याची २५ वर्षे एक यशस्वी उद्योजक म्हणून कारकीर्द घडवताना विदुर महाजन यांना व्यवस्थेतील भ्रष्टाचाराशी सामना करावा लागला. मात्र कुठल्याही दबावाला बळी न पडता, एका रुपयाचीही लाच न देता, त्यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध समर्थपणे लढा दिला. या लढ्याची यशोगाथा त्यांच्या ‘शोधयात्रा’ या दुसऱ्या पुस्तकात सामावली आहे. या पुस्तकानेदेखील साहित्यक्षेत्रातील मानाचे अनेक पुरस्कार पटकावले आहेत. याव्यतिरिक्त, उन्मेष प्रकाशनातर्फे ‘ग्रीष्म’ हा त्यांचा काव्यसंग्रह आणि ‘एका स्वरवेड्याची आनंदयात्रा’ हे त्यांच्या सांगीतिक आयुष्यावर आधारित पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. त्यांच्या ‘खेडोपाडी रागसंगीताचा प्रसार’ या प्रकल्पांतर्गत नुकतेच ७५ कार्यक्रम पूर्ण झाले. एक मनस्वी कलावंत, तत्त्वज्ञ, उद्योजक, लेखक, गुरू, व्यवस्थापक असे व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू असलेले विदुर महाजन यांच्याशी त्यांच्या या प्रकल्पाविषयी मारलेल्या गप्पा.

**प्रश्न –** नमस्कार विदुरजी. सतारीच्या माध्यमातून तुम्ही आजवर दोन प्रकल्प यशस्वी केलेत. आपण आज ज्या प्रकल्पाविषयी चर्चा करणार आहोत, तो म्हणजे खेडोपाडी रागसंगीताचा प्रसार! मुळात ही संकल्पना काय आहे? आणि तुम्हाला ही संकल्पना कशी सुचली?

– खरं तर, शहरांमध्ये अभिजात संगीत या एकूणच क्षेत्रामध्ये खूपच व्यावसायिकता आली आहे आणि कलाकारांना समाजाश्रय मिळाला असल्याने जिथे उदरनिर्वाह होईल, अशाच ठिकाणी शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम होत राहतात. यामुळे अशा कार्यक्रमांची एक ठरावीक किंमत ठरवली जाते, जी खेडेगावामध्ये लोकांना देता येत नाही. त्यामुळे पूर्वी छोट्या गावांमध्ये थोड्या-फार प्रमाणात होणारे कार्यक्रमही नंतर-नंतर यामुळे होईनासे झाले. या सर्वांचा परिणाम म्हणून खेड्यांमध्ये रागसंगीत-



जे अभिजात आहे, सुंदर-शुद्ध स्वरूप आहे आणि आपले आहे, ते- पोहोचतच नाही. तिथल्या स्थानिक लोकांची सांगीतिक भूक लोकसंगीतातून, स्थानिक गाण्यांतून, भजनांतून भागवली जाते. मात्र संगीताबद्दलचा सखोल विचार त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाही आणि ज्या अभिजात संगीताचा आपण हजारो वर्षांचा वारसा सांगतो, त्या संगीताबद्दल ग्रामीण भागातील लोकांमध्ये जवळपास पूर्ण अनभिज्ञता आढळते.

वास्तविकपणे भारताची संपूर्ण विश्वात अतिशय चांगली ओळख ज्या काही गोष्टींमुळे-व्यक्तींमुळे आहे, त्यामध्ये पं.रवी शंकर यांनी सतारीच्या माध्यमातून मांडलेले भारतीय रागसंगीत हे अग्रस्थानी आहे. आणि त्याच भारतातील खेड्यापाड्यांमध्ये जिथे आजही सर्वाधिक भारतीय आपले जीवन जगतात, तिथेच याबाबत माहिती नसल्याचे दिसून येते. म्हणून ज्या पं.रवी शंकर यांनी सतार आणि एकूणच रागसंगीत भारताबाहेर सातासमुद्रापार नेले; त्यांच्यापासूनच प्रेरणा घेऊन मीसुद्धा सतारीच्या माध्यमातून तेच अभिजात रागसंगीत भारतातील कोनाकोपऱ्यात, खेडोपाडी पोहोचवण्याचा सर्वशक्तिनिशी प्रयत्न करण्याचा मानस केला. याच प्रेरणेतून या प्रकल्पाचा जन्म झाला.

**प्रश्न –** हा प्रकल्प सुचल्यानंतर प्रत्यक्ष कामांना, कार्यक्रमांना सुरुवात कशी झाली? प्रकल्प साकारताना तुम्हाला अडचणींचा सामना करावा लागला का?

– सतार या वाद्याची माहिती, इतिहास, परंपरा याविषयी खेडोपाडी जाऊन बोलावं; रागसंगीताविषयी बोलावं; तिथल्या लोकांच्या मनातील गैरसमजुती दूर कराव्यात, असे मनात असताना तळेगावच्या डॉ.देसाई यांनी 'मैत्रबन ट्रस्ट'ला एक लाख अकरा हजार रुपयांची देणगी देऊ केली. सर्व विश्वस्तांशी आणि डॉ.देसाई यांच्याशी बोलून हे पैसे खेडोपाडी रागसंगीताचा आणि सतारीचा प्रचार या कामासाठी वापरण्याचे मी ठरवले. प्रकल्पाचे स्वरूप आणि कुठल्याच सोईसुविधा नसलेल्या खेडोपाडी जाण्याची शक्यता पाहता लक्षात आले की, या कामासाठी दर्जेदार ध्वनियंत्रणा हवी. यासाठी पुण्यामधील या क्षेत्रातील दिग्गज नितीन चंद्रचूड यांचा सल्ला घेण्याचे ठरवले. त्यांना माझी संकल्पना आवडली आणि त्यांनी सल्ल्याची फी न घेता, उलट सारी यंत्रणाच मला आणून देण्याचे मान्य केले. यानंतर लगेचच टाटा इन्फ्रास्ट्रक्चर रिअल्टी लि.चे सीईओ संजय उबाळे यांनी प्रायोजकत्व म्हणून पाच लाख रुपये मंजूर केले, पण 'इतके नको' म्हणत मी अडीच लाख रुपये या कामासाठी स्वीकारले. काही जवळच्या मित्रांनी, पत्नी अपर्णाने, मुलगी नेहाने थोडे-थोडे करत एकूण पाच लाख रुपये उभे केले; तेदेखील कल्पना मनात आणल्यानंतर अवघ्या एका आठवड्यात!

मग लगेचच कामाला लागलो आणि ठरवले- एका वर्षाच्या आत ३० खेड्यांमध्ये कार्यक्रम करायचे. सुरुवातीला वारकरी संप्रदायातील काही लोकांच्या मदतीने कार्यक्रम ठरवण्याबद्दल आखणी केली; मात्र त्यांच्या उदासीनतेमुळे मीच शाळांशी संपर्क करण्याबाबत पुढाकार घेतला आणि हा प्रयत्न यशस्वी झाला. सुरुवातीला काही शाळांमध्ये अपुऱ्या नियोजनाचा त्रास झाला; मात्र त्यानंतर सतार, संगीत आणि मुलांशी आपुलकीने संवाद यांनीच ते कार्यक्रम संस्मरणीय ठरतील इतके यशस्वी केले. दरम्यान, या प्रकल्पाला नावही दिले गेले आणि त्यावर नेहाचा मित्र दीपक थॉमस याने या कार्यक्रमांचे व्हिडिओ शूटिंग करून माहितीपट करायचे ठरवले. इतक्यात माझी एक कवयित्री मैत्रीण आश्लेषा महाजन हिच्या मदतीने जळगावचे यजुर्वेंद्र महाजन यांच्याशी संपर्क करत उत्तर महाराष्ट्राचा दौरा आखला. प्रकल्प हळूहळू प्रसिद्धीस जात होता आणि लोकांच्या, विद्यार्थ्यांच्या पसंतीस उतरत होता. यानंतर मात्र शाळांमागून शाळा मिळत गेल्या अन् त्यानंतर प्रकल्पाने मागे वळून पाहिलेच नाही.

**प्रश्न –** या प्रकल्पांतर्गत तुम्ही खेड्यांमधील शालेय विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून कार्यक्रम करण्यामागचा काही विशेष उद्देश होता का?

– हो. मी हा कार्यक्रम खेड्यांमधील सातवी ते दहावी या वर्गातील मुलांसमोर सादर करतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे, सातवी ते दहावी हे संस्कारक्षम वय आहे. या वयोगटातील मुले नव्या गोष्टी अधिक लवकर, अधिक उत्सुकतेने आणि संयमाने ग्रहण करतात. या वयामध्ये मुलांना चांगले ऐकायला-बघायला मिळाले, तर ते त्यांच्या मनात कुठे तरी खोलवर रुजते. आणि आयुष्यात नंतर त्यांना संगीतविश्वात जेव्हा काही तरी करावेसे वाटेल किंवा योग्य संधी मिळेल, तेव्हा याचा नक्कीच उपयोग होईल. शालेय मुलांना केंद्रस्थानी ठेवण्यामागे अजून एक कारण असे आहे की, माहिती-तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आणि औद्योगिक भरभराटीमुळे एक प्रकारचा चंगळवाद वाढीस लागलेला दिसतो. या चंगळवादावर एक महत्त्वाचे प्रभावी उत्तर म्हणजे कला! माणूस एकदा का कलेत रमला की, त्याला चंगळवादासारख्या अनेक भौतिक गोष्टी

आपोआपच नकोश्या होतात; उलट तो अधिक अंतर्मुख, जबाबदार, संस्कारी होतो. कलेमुळे जीवनाचा उद्देशच बदलून जातो. कलासाधना हा उद्देश असेल तर, दैनंदिन जगण्यातले प्राधान्यक्रम बदलतात. त्यामुळे माणसाला कलेत रमवण्याचे प्रयत्न अशा उद्देशाने या प्रकल्पाकडे पाहता येईल.

आजकाल आजूबाजूला मनोरंजन म्हणून जे काही ऐकले-पाहिले जाते, ते अत्यंत हीन दर्जाचेच आहे असे मला वाटते आणि त्यामुळे माणूस निष्क्रियही होतो. त्या तुलनेत सतारवादन आणि एकंदरीतच रागसंगीत हे एक प्रकारचे अभिजात व कृतिशील मनोरंजन आहे. त्यामुळे हा प्रकल्प म्हणजे नुसतीच संगीताची ओळख यापुरता मर्यादित नाही. मी सतार वाजवत असल्यामुळे व मुलांसमोर वाजवून दाखवत असल्यामुळे मला मुलांपर्यंत पोहोचण्याची एक संधी मिळते आणि ती मिळाल्यानंतर मी मुलांना कृतिशील मनोरंजनाच्या अनुषंगाने अनेक गोष्टी सांगतो. या सांगण्याचा मुलांवर चांगला परिणाम होतो. आता या सांगण्यामध्ये थेट संगीत वगैरे काही नसले, तरी मला मुलांपर्यंत काही तरी चांगले विचार पोहोचवण्याची संधी मिळते. त्यामुळे या वाद्याच्या माध्यमाद्वारे मुलांपर्यंत कलेविषयीचा दृष्टिकोन, जीवनविषयक दृष्टिकोन, उपभोगवादाविषयी दृष्टिकोन, शिक्षणाविषयी दृष्टिकोन, अभिव्यक्तीविषयी दृष्टिकोन पोहोचवतो. म्हणजे, माणूस विकसित होतो याचा अर्थ तो जास्तीत जास्त अभिव्यक्त होतो, असे मुलांपर्यंत बिंबवले जाते. अभिव्यक्तीचे एक माध्यम म्हणून शब्द आणि स्वर एकत्रितपणे कसे मदतीला येतात, हे मुलांना पटते. मुलांना मी हे पटवून देतो की, संगीत ही स्वरांची भाषा आहे आणि इतर कुठल्याही भाषेसारखी नसून ती सार्वत्रिक आहे.

**प्रश्न –** शालेय मुलांसमोर कार्यक्रम सादर करताना त्या कार्यक्रमाचे नेमके स्वरूप काय असते?

– माझा कार्यक्रमासाठी ठरवलेला श्रोतावर्ग सातवी ते दहावीची मुले असा असल्याने त्यांना आवडेल, पचेल, रुचेल आणि कंटाळा येणार नाही अशी भाषा वापरतो. ती भाषा म्हणजे गोष्टीरूपात सांगणे. म्हणून मी नेहमीच सुरुवात करतो ती एका गोष्टीने– याने मुलांची उत्कंठा वाढते. गोष्ट सांगण्यापूर्वी मी त्यांना सांगतो की– मी तुमच्यावरच्या आपलेपणामुळे, प्रेमापोटी आणि तुमच्यासाठी नि:स्वार्थीपणे इतक्या दूर आलो आहे; मला तुम्हाला काही तरी सांगायचे आहे. असे म्हटल्यानंतर त्या वयातील मुलांच्या डोळ्यांतली उत्सुकता मला स्पष्टपणे जाणवते, याच उत्सुकतेला मी गोष्टी सांगून फुलवण्याचा प्रयत्न करतो. सोबतीला वाद्य वाजवून दाखवत असल्याने ती उत्सुकता संपूर्ण कार्यक्रमभर कायम राहते. हे वाद्य अवघड आहे, असे मी त्यांना कधीही सांगत नाही; उलटपक्षी ते कसं कोणीही वाजवू शकतं, हेच त्यांना पटवून देतो. त्याला कोणतीही गूढता जोडत नाही, दैवी काही बोलत नाही! तपश्चर्या, अखंड मेहनत, प्रचंड साधना असे शब्द वापरत नाही; याउलट त्यांना हा विश्वास देतो की– विद्यार्थी म्हणून, नोकरदार म्हणून किंवा शेतकरी म्हणून आयुष्य चांगल्या प्रकारे जगून, त्यातून कलेसाठी थोडा वेळ काढला तर त्यांना आयुष्यात खूप भरभरून मिळू शकते. मुले विस्मयकारकपणे ‘अरेच्चा! आपल्यालाही हे जमू शकेल की!’ असं विश्वासानं म्हणतात.

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मुलांसमोर कार्यक्रम सादर करताना मी सतारीवर फक्त रागसंगीतच वाजवतो; गाणी किंवा अभंग वाजवत नाही. कारण गाणी वाजवून दाखवणे, हा माझा उद्देश नाही; मूळ उद्देश रागसंगीताच्या प्रसाराचा आहे. मला रागसंगीताची ओळख करून द्यायची आहे. रागसंगीताचे मूळ नादसाधना आहे, त्या नादसाधनेबद्दल मला सांगायचे असते. त्यामुळे मी गाण्यांविषयी बोलत नाही, मुलासमोर फक्त रागच मांडतो; तरीही ते मुलांना खूप भावते, आवडते. त्यामुळे एक महत्त्वाचा संदेश मुलांपर्यंत पोहोचवतो, तो म्हणजे ‘शास्त्रीय संगीत आवडण्यासाठी ते कळण्याची गरज नाही’. मुलांसमोर वाजवून दाखवल्यावर त्यांना विचारतो, ‘आज तुम्ही जे ऐकले, ते संगीत कोणतं?’ सगळी मुले ओरडतात, ‘शास्त्रीय संगीत!’, मी विचारतो, ‘तुम्हाला ते आवडलं का?’ ते एकसुरात म्हणतात, ‘हो, खूप आवडलं’. मी पुन्हा विचारतो, ‘तुम्हाला ते कळलं का?’ तर मुले नकारार्थी माना डोलावतात. मग मी त्यांना सांगतो, ‘शास्त्रीय संगीत आवडण्यासाठी कळण्याची गरज नाही, हे तुम्हाला मान्य आहे का?’ सगळी मुले ओरडतात, ‘हो!’ मुलांचा हा सामूहिक होकार मला प्रेरणा देतो.

**प्रश्न :** तुम्ही या कार्यक्रमामध्ये रागसंगीतच वाजवता, हे कळलं. पण म्हणजे नेमकं काय, हे थोडं समजून सांगाल काय?

– मुळात राग म्हणजे भाव! आणि वेगवेगळे राग हे वेगवेगळे भाव दर्शवतात. रागांचे मूळ जरी स्वरांमध्ये असले, तरी त्याच स्वरांच्या वेगवेगळ्या प्रकारे झालेल्या

समूहातून वेगवेगळे राग आणि वेगवेगळी भावनिर्मिती होते, हे मी मुलांना पटवून देतो. हा कार्यक्रम मुलांसमोर सादर करायचा असल्याने मी ‘वेळेनुसार रागांची निवड’ हा संकेत काहीसा बाजूला ठेवून उत्स्फूर्तपणे रागाची निवड करतो. या कार्यक्रमामध्ये सतारीवर एखादा राग शास्त्रशुद्ध पद्धतीने विस्तृतपणे (सतारीवर वाजवताना आलाप, बढत, उपज, जोड, झाला, इत्यादी टप्प्यांत रागाचे सादरीकरण होते) सादर करण्याऐवजी अगदी थोडक्यात तो राग अशा पद्धतीने वाजवतो की, त्यातून त्या विशिष्ट रागाची प्रभावीपणे भावनिर्मिती होते आणि मग वाजवल्यानंतर चर्चा करता–करता संपूर्ण कार्यक्रमादरम्यान मुलांसमोर अजून इतर दोन–तीन वेगवेगळ्या रागांची सतारीवर मांडणी करतो. यामुळे एक फायदा असा होतो की, थोड्या वेळातच, आणि एकाच कार्यक्रमामध्ये मुलांना वेगवेगळे राग ऐकायला मिळतात, त्यांना वेगवेगळ्या रागांनुसार वेगवेगळ्या भावनिर्मितीचा अनुभव मिळतो. त्यातच सतार हे स्वरप्रधान वाद्य असल्याने त्यावर राग मांडण्याचा मला अजून एक फायदा होतो की, भाव व्यक्त करण्यासाठी स्वर हे शब्दांपेक्षा प्रभावी माध्यम आहेत, हे मुलांना उदाहरणादाखल समजावून सांगता येते. मग ‘शब्दांवाचून कळले सारे, शब्दांच्या पलीकडले’ या उक्तीप्रमाणे भावनिर्मितीसाठी शब्दांची गरज नाही, हा मुद्दा लगेचच त्यांना पटतो. आता साऱ्याच शाळांमध्ये मी ठराविकच दोन–तीन राग न निवडता, त्या–त्या वेळेला मुलांसमोर मी उत्स्फूर्तपणे राग निवडतो. उदा. यमन, बिहाग, शिवरंजनी, तोडी, मारवा, अहीर भैरव, वगैरे. त्यामुळे अर्थातच वेगवेगळ्या शाळांमध्ये वेगवेगळे राग मांडले जातात आणि म्हणूनच प्रत्येक शाळेतला कार्यक्रम हा वेगळा आणि विशेष ठरतो.

**प्रश्न –** मग यासाठी खेड्यातीलच मुले का निवडली? शहरातील का नाही?

– याचं नेमके उत्तर द्यायचं म्हटलं तर– खेडेगावातील मुलांच्या आजूबाजूला असलेला भोवताल व शहरातील मुलांच्या आजूबाजूला असलेला भोवताल यामध्ये प्रचंड फरक आहे. शहरामध्ये मूल जेव्हा शाळेत जायला बाहेर पडतं; तेव्हा ते त्याच्या स्कूल बसमधून बाहेर पडतं– ते ट्रॅफिक, प्रदूषण आणि गोंगाटातून जातं. हे वातावरण संगीतसाधनेला पोषक नाही. इतकेच नव्हे तर– आजची शहरी घरे, त्यातील वापरायच्या वस्तू इतक्या मानवनिर्मित, कृत्रिम आहेत आणि निसर्गापासून दूर गेल्यात की, ते कुठल्याही प्रकारच्या कलेसाठी पोषक नाही. याउलट, खेडेगावातल्या मुलांना बाहेर पडल्यानंतर हिरवाई, सुंदर शेती, मुक्त हवा, गाई–गुरे दिसतात; सूर्योदय–सूर्यास्त दिसतो, सुंदर निसर्ग दिसतो. निसर्गाच्या सानिध्यात–किंबहुना, निसर्गातच खेडेगावातील मुले राहत असल्याने आणि संगीतसुद्धा निसर्गातूनच आलेले असल्यामुळे त्यांना संगीतशिक्षणासाठी अधिक पोषक वातावरण आहे, शिवाय इंटरनेटचा प्रभाव खेडेगावात अजून तितका नसल्याने त्या मुलांकडून काही तरी नवं, निर्मितिक्षम घडण्याची शक्यता अधिक आहे.

**प्रश्न –** कार्यक्रम– मग तो कुठलाही असो– तो यशस्वी करायचा म्हटले की, त्यासाठी नियोजन, आवश्यक ती साधनसामग्री इत्यादी गोष्टी ओघाने येतात. हा प्रकल्प मुळातच सतत वेगवेगळ्या शाळांमध्ये फिरत असल्याने प्रवास हा अपेक्षितच आहे. या सर्वांचे आर्थिक नियोजन तुम्ही कसे साधले?

– अगोदर सांगितल्याप्रमाणे हा प्रकल्प सुरुवातीला काही संस्थांनी पुरस्कृत केला होता, याशिवाय काही व्यक्तींनीही मदत केली होती. त्यानंतर मी शाळांना यातील काही भाग उचलण्याची विनंती केली. मुख्यत्वे अर्थाजन हा अजिबात हेतू नसल्याने या कार्यक्रमाचा खर्च नगण्य असतो. त्यामुळे शाळेच्या आवाक्यातच हा खर्च येतो. आजवरचा अनुभव पाहता, शाळांनी अगदी आनंदाने या खर्चाला तयारी दर्शवली. साधनसामग्रीबद्दल बोलायचे म्हटल्यास, शक्यतो मी प्रत्येक कार्यक्रमासाठी ध्वनियंत्रणा सोबत घेऊन जातो.

**प्रश्न –** एक विद्यार्थिकेंद्रित प्रश्न मला तुम्हाला विचारायचा आहे. मुलांसाठी, त्यांच्यासमोर कार्यक्रम सादर झाल्यानंतर पुढे काय? तुमच्या शाळाभेटीतून त्या शाळांमधील बरीचशी मुले सतार, रागसंगीत याकडे आकर्षित होत असतील. त्यांना सतार शिकाविशी वाटली, तर खेड्यांमध्ये अशा सोईंचा अभाव असताना त्यांनी पुढे काय करावे?

– पुण्यात ‘हार्मनी स्कूल ऑफ सितार’ नावाची माझी शाळा आहे. खेडेगावातून जर कुणी आले, तर त्यासाठी अत्यंत माफक खर्चामध्ये, वेळप्रसंगी फुकट तिथे सतारशिक्षण देण्याची माझी तयारी आहे. इतकंच नाही, तर मिरजेला सतार बनवणारे आमचे जे संबधित आहेत, त्यांच्याशी सतत चर्चा करून कमीत कमी किमतीत सतार कशी उपलब्ध करून देता येईल, याकडे आमचा प्रयत्न असतो. गिटारच्या किमतीत सतार उपलब्ध करता येईल

का, यासाठी मिरजेतल्या सतार बनवणाऱ्या लोकांचे परिश्रम चालू आहेत. ज्या विद्यार्थ्यांना हासुद्धा खर्च पेलवत नाही, त्यांना वेळप्रसंगी आम्ही वाद्यदेखील उपलब्ध करून देतो. याचा फायदा घेऊन काही विद्यार्थ्यांनी माझ्याकडे सतार शिकायला सुरुवात केली आहे. सर्वदूर ठिकाणांहून मुले माझ्याकडे सतार शिकण्याची इच्छा फोनवर व्यक्त करतात. आता सातवी ते दहावीमध्ये शिकणारी खेड्यातली मुले पूर्णवेळ पुण्यात येऊन सतार शिकू शकत नाहीत; पण जेव्हा कधी ही मुले नंतर पुण्यात उच्च शिक्षणासाठी येतील, तेव्हा ती शिकू शकतात. महाराष्ट्राच्या विविध भागांतून शालेय मुले दिवाळीच्या किंवा उन्हाळ्याच्या सुट्टीत सतार शिकायला येऊ शकतात. या महिनाभराच्या काळामध्ये पुढील सहा महिने सरावाद्वारे पुरेल इतके सतारीचे ज्ञान ते नक्कीच घेऊ शकतात. समाधानाची गोष्ट म्हणजे, सुट्टीत अशा प्रकारच्या शिक्षणासाठी या वयातील मुलांना पाठवण्याची मानसिकता आता तयार होते आहे.

**प्रश्न** – या प्रकल्पांतर्गत आजवर किती शाळांमध्ये हा कार्यक्रम सदर झाला? या प्रकल्पाचा तुमचा अनुभव कसा होता?

– सप्टेंबर २०१३ मध्ये मंगरूळ गावात श्री गणेशा केलेल्या प्रकल्पाने अवघ्या सव्वादोन वर्षांत पुणे, सातारा, सोलापूर, धुळे, नंदुरबार, जळगाव या सहा जिल्ह्यांतील खेड्यांतील शाळांचा दौरा केला. यामध्ये आजवर ७५ शाळांतील ३५००० हून अधिक शालेय विद्यार्थ्यांनी, १५००० हून अधिक खेड्यातील गावकऱ्यांनी, शिक्षकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. ऐकताना विश्वास बसणार नाही; पण यातील सत्य असे की– इतक्या विद्यार्थ्यांमध्ये, लोकांमध्ये एकानेही तोपर्यंत सतार प्रत्यक्ष पहिली वा ऐकली नव्हती. मग नेहमीच गडबड-गोंधळ करणारी, मात्र कार्यक्रम ऐकताना मंत्रमुग्ध झालेली मुले, नीरव शांततेत ऐकणारी मुले त्यांच्यामधल्या अतीव उत्सुकतेचीच पावती देतात. उदाहरणादाखल सांगायचे तर, चाळीसगावला एका शाळेमध्ये १८०० मुले कार्यक्रमासाठी जमली. शिक्षक मुलांना 'शांत राहा', असे शिटी वाजवून आणि हरतऱ्हेने



सांगत होते. मुले काही शांत होत नव्हती. मी स्टेजवर आल्यानंतरही परिस्थिती तशीच. मग माईक घेऊन मी त्यांना इतकेच सांगितले, ''तुम्हाला नवं, वेगळं काही तरी सांगण्यासाठी मी इथे आलो आहे. तुम्ही जर शांत बसलात तर मी तुमच्याशी बोलू शकणार आहे, त्यामुळे मला तुमचे कान द्या,'' असे कळकळीचे आवाहन केल्यावर मुलेसुद्धा हेलावली. त्यांनाही उत्सुकता निर्माण झाली. एक मिनिटात सगळी मुले नि:शब्द झाली. प्रत्येक कार्यक्रमानंतर सतारीला जवळून बघताना, सतारीला हलकासा स्पर्श करताना, प्रश्न विचारताना, ऑटोग्राफ घेताना या मुलांची अक्षरश: झुंबड उडते. इतकेच नाही तर– कार्यक्रमानंतर घरी आल्यावर, 'मला सतार शिकायची आहे', असे येणारे त्यांचे अनेक फोन सतार व रागसंगीत त्यांना आवडले, त्यांच्यापर्यंत थोडे तरी पोहोचले याची खात्री देतात. अशा अनेक मुलांनी मला पाठवलेली पत्रे हा माझा अमूल्य ठेवा आहे.

**प्रश्न –** अगदी पहिल्या कार्यक्रमापासून ते ७५ व्या कार्यक्रमापर्यंत, तुम्हाला वाढत्या अनुभवानुसार कार्यक्रमाच्या स्वरूपामध्ये काही बदल करावेसे वाटले का?

– खरं सांगायचं तर– जरी प्रत्येक कार्यक्रम हा मुलांसमोर होणार असला, तरी माझ्यासाठी तो आव्हानात्मकच असतो. मग मुले शंभर असतील; वा हजार असतील, ती माझ्यासमोर पहिल्यांदा बसलेली असतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या आयुष्यात अविस्मरणीय आठवण राहील, असा आपला कार्यक्रम व्हावा अशी उत्कट इच्छा माझ्या मनात असते. हा कार्यक्रम मुलांना आवडेल ना, आपण बोलू ते मुलांना पटेल ना– याबाबत माझ्याही मनात आत्यंतिक उत्सुकता असते. त्यामुळे मुलांच्या प्रश्नांमधून, मित्रांच्या तसेच विद्यार्थ्यांशी झालेल्या चर्चांमधून मीसुद्धा या कार्यक्रमात आपल्याला आणखी काय काय चांगले महत्त्वाचे सांगता येईल, हे शोधण्याचा प्रयत्न करतो.

**प्रश्न –** हा कार्यक्रम म्हणजे मुलांसाठी खरोखरच संस्मरणीय असाच अनुभव असणार, जो त्याच्या मनात दीर्घ काळ रेंगाळत राहील. पण या कार्यक्रमांतून तुमच्या दीर्घ काळ आठवणीत राहिला, असा एखादा प्रसंग सांगाल का?

– खरं म्हणजे– प्रत्येक शाळा वेगळी, खेडं वेगळं आणि मला मिळणारा अनुभवही चांगला अन् वेगळा असतो. पण त्यातला त्यात एक प्रसंग माझ्या मनात खोलवर कोरला गेला आहे. नंदुरबार जिल्ह्यामध्ये वेली नावाचे सातपुडा पर्वतरांगेतले छोटे गाव. तिथल्या एका आदिवासी शाळेत मला डॉ.टाटिया यांनी कार्यक्रमासाठी बोलावले होते. गेली ३५ वर्षे तिथल्या आदिवासी लोकांसाठी डॉ.टाटिया काम करतात, ती शाळा ते चालवतात. त्या शाळेतील ६०० मुलांसमोर माझा कार्यक्रम झाला. अपेक्षेप्रमाणे त्या मुलांनी अशा प्रकारे प्रत्यक्ष सतार ऐकण्याचा किंवा पाहण्याचा काही प्रश्नच नव्हता. मला जे बोलावंसं–सांगावंसं वाटलं, ते बोललो–सांगितलं. ते आदिवासी असल्याने त्यांच्या अंगभूत हस्तकौशल्याबद्दल मी त्यांना सांगितलं. सतार हे बोटांनी वाजवण्याचे वाद्य असल्याने, त्यांची बोटे जी निसर्गत: अनेक कामांमध्ये कुशल आहेत; तशी ती सतारीवरही होऊ शकतील, असा विश्वास मी त्यांना दिला. या सगळ्या कार्यक्रमानंतर त्यांना काही विचारायचे असेल, प्रश्न असतील, तर ते विचारण्याचे कळकळीचे आवाहन केले. त्या वेळेला कित्येक आदिवासी मुलांनी काही प्रश्न विचारले. ते पाहून त्या आदिवासी मुलांसाठी काम करणारे डॉ.टाटिया यांचेही डोळे पाणावले. कारण ते नंतर मला म्हणाले, 'ही मुलेच काय, ही माणसंसुद्धा वर्षानुवर्षे बोललेलीच नाहीत. आज पहिल्यांदाच असं घडलंय की, ही मुलं बोलली आणि त्यांना तुम्ही वाचा फोडलीत!' असे प्रसंग मलासुद्धा अंतर्मुख करतात.

**प्रश्न –** हा कार्यक्रम तुम्ही खेड्यांमध्ये करता; मग तो फक्त शाळांमध्येच केला जातो का?

**प्रश्न –** नाही, हा कार्यक्रम फक्त शाळांमध्येच केला जात नाही. या प्रकल्पाचे शीर्षक आहे, 'रागसंगीताचा खेडोपाडी प्रसार!' ज्या वेळेला मला खेड्यातील लोकांपर्यंत पोहोचण्याचा इतर मार्ग मिळाला नाही, त्या वेळेला प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी मी शाळांचा मार्ग निवडला. खेड्यांमध्ये कार्यक्रमाचा प्रस्ताव देताना तिथल्या सरपंचांच्या किंवा ज्येष्ठांच्या मदतीने या प्रकल्पातील काही कार्यक्रम आतापर्यंत देवळांमध्ये, गावांतील चौकांमध्ये सादर झाले आहेत. याबाबतीत माझ्या काही गोड आठवणीसुद्धा आहेत. कार्यक्रमाच्या अगोदर दवंडी पिटवून 'आज आपल्याकडे पुण्याहून विदुर महाजन आले आहेत होऽ' अशी माहिती काही गावांत दिली गेली. चावडीवर ध्वनियंत्रणा कार्यान्वित करून कार्यक्रम सुरू करतो आणि बघता–बघता सात–आठशे लोक चौकात, रस्त्यावर जमा होतात; बारदान, प्लॅस्टिकच्या गोण्यांवर आसनस्थ होतात

आणि कार्यक्रमाचा रंग उत्तरोत्तर वाढत जातो.

**प्रश्न –** इतक्या सव्वादोन वर्षांच्या कमी कालावधीत ७५ कार्यक्रम केलेत, त्यामुळे सरासरी दर १० दिवसाला एक कार्यक्रम– इतक्या वेगाने हे कार्य चालू आहे. हे इतकं तुम्ही कसे काय करू शकलात? इतकी ऊर्जा कुठून जमवली?

– मला चांगली माणसं भेटत गेली; त्यांना या कामाविषयी कळल्यानंतर आस्था वाटली, त्यांनी पुढाकार घेतला. टाटा इन्फ्रास्ट्रक्चर आणि रिअल्टीने सुरुवातीच्या ३० कार्यक्रमांचे प्रायोजकत्व घेतले, त्यामुळे सुरुवातीला आर्थिक अडचणच नव्हती. नंतर यजुर्वेंद्र महाजनांमुळे जळगाव जिल्ह्याचा दौरा झाला. जुन्नर/ओतूर येथील दौऱ्याचे तूच नियोजन केलं होतंस. नुकताच झालेला सोलापूरचा दौरा ग्रंथालीचे दिनकर गांगल यांच्या सहकार्याने, तर अद्वैत देशपांडे यांच्यामुळे फलटणचा कार्यक्रम करता आला. कराडला डॉ.ताम्हणकर, साताऱ्याला डॉ.मिलिंद शहा, पाटणला दादासाहेब पाटणकर, चाळीसगावला श्रीमती कविता बागुल अशी अनेक माणसं मला त्यानिमित्ताने जोडता आली; ही माणसं माझ्या आयुष्यात आली. त्यांनी या प्रकल्पाविषयी आस्था दाखवली, त्यांच्या प्रयत्नामुळेच मी हे करू शकलो.

**प्रश्न –** तुम्ही इतकी वर्षे सतार वाजवत आहात, साधना करता आहात, संगीताचे इतके कार्यक्रम झालेत, पुस्तके लिहिलीत; आता तुमचे स्वप्न काय आहे?

– जगाचे माहीत नाही; पण ज्या महाराष्ट्रात मी राहतो, ज्या मराठी मातीत मी वाढलो– त्या महाराष्ट्राला तरी हे वाद्य खेडोपाडी माहिती व्हावे, सर्वदूर पोहोचावे आणि मला त्याचे निमित्त व्हायला नक्की आवडेल. ज्या सतारीने मला एक वेगळी ओळख दिली, त्या सतारीसाठीही छोटीशी का होईना– पण उतराई होण्याची ही एक संधी असेल.

आणि तसं पाहिलं तर, आपला महाराष्ट्र इतका मोठा आहे की, माझ्या एकट्याने हे काम होणार नाहीये. हे काम, हा प्रकल्प– एक रोल मॉडेल प्रकल्प म्हणून जर इतर कलाकारांनी त्याकडे पाहिलं, व्यक्तिश: स्वतंत्रपणे काम केलं; तर हे काम नक्कीच बरंच पुढे जाऊ शकेल. माझ्या बाबतीत बोलायचे झाले तर– जोपर्यंत माझ्यात त्राण आहेत तोपर्यंत मी हे काम मनापासून करत राहीन.

**प्रश्न –** ही मुलाखत वाचून एखाद्या शाळेला नक्कीच तुमचा कार्यक्रम त्या शाळेतील मुलांसमोर प्रस्तुत करण्याची इच्छा होईल, यात शंका नाही. त्यांना जर हा कार्यक्रम ठेवायचा असेल, तर त्यांनी काय करावं? तुमच्याशी कसा संपर्क साधावा?

– माझी वेबसाईट www.vidurmahajan.com अशी आहे. त्यावर माझ्या सतारवादनाबद्दल आणि इतर सर्व प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती दिली आहे. त्यावरून ते माझ्याशी संपर्क करू शकतात किंवा थेट माझ्याशी ९८२२५५९७७५ या मोबाईलवर फोन करू शकतात. एखाद्या शाळेतील संबंधित व्यक्ती जर कार्यक्रमाचे आयोजन करणार असेल, तर शक्यतो आजूबाजूच्या परिसरातील आणखी– उदाहरणार्थ चार-पाच शाळांशी बोलून जर दोन दिवसांचे नियोजन केले, तर एकूणच त्या दौऱ्यासाठी लागणारा खर्च विभागून जाईल आणि प्रत्येक शाळेवर खर्चाचा कमीत कमी ताण येईल. त्यामुळे शाळांच्या समूहाने किंवा तालुकानिहाय-जिल्हानिहाय अशा प्रकारचे एकत्रितपणे नियोजन केले, तर त्याचा फायदा एकाच वेळी अनेकांना होईल. उदाहरणादाखल सांगायचे तर– जर एखाद्या कंपनीने, संस्थेने वा संघटनेने केवळ एक लाखभर रुपयांचे प्रायोजकत्व जरी स्वीकारले; तरीसुद्धा एका आठवड्याच्या कालावधीत एका जिल्ह्यातील १५ कार्यक्रमांचे नियोजन करता येणे शक्य आहे. समाजातील विविध व्यक्तींनी, समूहांनी, संस्थांनी या कार्यासाठी पुढे येऊन वर्गण्या-देणग्या देऊ केल्या, तर या कामास खरोखरच खूप बळ मिळेल.

**(विदुर महाजन** / Mob. : 9822559775)

मुलाखतकार : **डॉ. विकास काशिद,**
सी.एम.एस., सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७
Mob. 9764889399